# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**परभणी – ४३१ ४०२ (महाराष्ट्र)**

ई-मेल : reg_ mau@rediffmail.com
वेबसाईट : www.vnmkv.ac.in

दुरध्वनी : (०२४५२) २२९७५५
फॅक्स : (०२४५२) २२९७५५,२२३५८२


---

जा.क्र.एसअे-२/कंत्राटी-२०१९
दिनांक. २९/०१/२०१९

## परिपत्रक

**विषय :- कंत्राटी तत्वावर जिप, कार, वाहन चालक कंत्राटदारा मार्फत कामावर घेण्या बाबत...**

विद्यापीठाअतंर्गत, कार्यालय प्रमुखांकडुन कंत्राटी तत्वावर जिप, कार, वाहन चालक कर्मचारी कामावर घेण्या बाबतचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त होतात.

**१. त्या अनुषंगाने सदर परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, कंत्राटी तत्वावर लावण्यात येणारे पद हे आपल्या कार्यालयाच्या नियमित आस्थापनेवर आकृतीबंधा प्रमाणे मजुंर आहे किंवा कसे या बाबतचा प्रस्तावात स्पष्ट/सविस्तर उल्लेख करावा. कार्यालयाच्या आस्थापनेवर जिप, कार, (ट्रॅक्टर वगळता) वाहन चालक पद मंजुर नसेल तर या बाबतचे प्रस्ताव परवानगीस्तव/मंजुरीस्तव या कार्यालयास पाठवू नयेत. विना परवानगी जिप, कार, वाहन चालक कंत्राटी तत्वावर लावल्यास त्याच्या वेतनाची व पुढील उदभवणाऱ्या अडचणीची जबाबदारी ही संबधित कार्यालय प्रमुखाची राहील, याची नोंद घ्यावी.**

२. सबब कामाची आवश्यकता व गरज विचारात घेउन किमान ६ महिने कामावर घेण्या बाबतचे प्रस्ताव किमान १ महिना अगोदर कार्यालयास सादर करावेत. तसेच दिनांक.०१.०२.२०१९ पासुन कार्योत्तर मजुंरीस्तव प्रस्ताव सादर करु नयेत. दि.०१.०२.२०१९ च्या नतंर कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव प्राप्त झाले तर ते अमान्य करण्यात आलेले आहेत असे गृहीत धरावे.

**३.** याशिवाय असेही की, काही वरिष्ठ अधिकाऱ्याकडे एकपेक्षा अधिक वाहने जिप/कार वापरात असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याअनुषंगाने सुचित करण्यात येते की, अशा अधिकाऱ्यांनी त्याच्यांकडील वाहनांपैकी केवळ एकाच वाहनाचा वापर करावा. तसेच त्यांच्याकडील उर्वरीत वाहने (जिप/कार) मा. कुलगुरु यांचे सामायीक संचामध्ये (Common Pool) तात्काळ जमा करावीत. प्रकरणी विलंब अपेक्षित नसून या संदर्भात होणाऱ्या विलंबास संबधित अधिकारी जबाबदार राहतील यांची नोंद घ्यावी.

**मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने.**

**(रणजीत आ. पाटील)**
**कुलसचिव**

**प्रति,**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण,/सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण)/विद्यापीठ अभियंता, नियंत्रक, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर.
२. वनामकृवि, परभणी अंतर्गत सर्व कार्यालय प्रमुख यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
३. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.